# अटलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष -१८, अंक-२२ ■ छत्रपती संभाजीनगर, सोमवार, दि. १० ते १६ फेब्रुवारी २०२५ ■ किंमत २ रूपये, पाने -४


# विनानंबरवर धुराळा उडवणाऱ्या हायवावर कारवाई कधी होणार?

## अवैध धंद्यावर अंकुश ठेवणारा छत्रपती संभाजीनगरचा आका कोण?

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

अवैध धंद्यासाठी वापरल्या जात असलेल्या विनानंबरच्या रेती 'हायवा'वर कारवाई करण्यात यावी, अशी सर्वसामान्य नागरिकांची मागणी आहे. परंतु बोलू तरी काय होणार म्हणून सर्व सामान्य माणूस या 'धनदांडग्या' गुंडगिरी करणाऱ्यांवर बोलणे तसेच आवाज उठवणे थांबवतो याचाच फायदा हे 'डॉन' लोक घेत असतात. देवळाली तसेच बीड बायपास येथे अनेक कामे चालू आहेत. तसेच अनेक विनानंब रच्याा हायवांच्या माध्यमातून बांधकाम साहित्याची हेराफेरी होते. सर्व प्रकारावरून असे दिसते.यासर्व अवैध कामाला कोणाचा वरद हस्त आहे. अवैध धंद्यावर अंकुश ठेवणारा छत्रपती संभाजीनगरचा आका कोण? असा प्रश्न आता सर्वसामान्यांना पडू लागला आहे.





भर दिवसा उन्हाच्या कडाक्यात धुरडा उडवत अवैध वाहतुकीसाठी कर्णकर्कश हॉर्न वाजवत निघालेला विनानंबर प्लेटचा 'हायवा'

वाहतूक पोलिसांना हे दिसत कसे नाही. अशा वाहनांचा वेगही जास्त प्रमाणत असतो. अगोदरच धुळधाण असलेल्या रस्त्यावर सुसाट वाहने चालवत धुराडा उडवत ही विनानंबरची वाहने फिरतातच कशी? असा प्रश्न का पडत नाही. यावरून साहजिकच आहे की, 'आर्थिक व्यवहार' तर झाला नसावाना....शेवटी विचार करण्यापर्यंतच सर्वसामान्य मजल मारू शकतात. बाकी सर्व व्यर्थ आहे.

### कारवाईसाठी अधिकचा पुढाकार घ्यावा....

दुचाकी वाहन चालकांवर कारवाई करण्यासाठी सर्वच वाहतूक अधिकारी, कर्मचारी टपून बसलेले असतात. यात मात्र काही चूक नाही. जे चुकीचे आहे ते चुकीचे परंतु दुसरीकडे हे बीनबोभाट अवैध वाहतूक करणाऱ्या विनानंब रच्या हायवावर करवाई का? केली जात नाही. आता असा कोणता 'आका'पैदा झाला आहे की त्याला आपली पोलिस यंत्रणा घाबरत आहे. दुचाकी स्वारावर तसेच इतर खासगी वाहतूक करणाऱ्यांना नियम आहेत. यांना नियम नाहीत का? एखादी कारवाई आपण केली तर त्याचा गवगवा देखील आम्ही पत्रकारीतेच्या माध्यमातून करतो. परंतु अशा अवैध कामावरदेखील आमचे कर्तव्य आहे की, हा सर्व प्रकार आपणांना दिसत असताना देखील आपण ते जर न पाहत नसाल दे दाखविणे आमचे कर्तव्यच आहे. आपण यावर योग्य कारवाई कराल अशीच अपेक्षा सर्वांना आहे आणि आकाचे हातपाय जास्त पसरणार नाही याची काळजी घ्यावी.



### कायदा सर्वांसाठी सारखा असवा....

अशा वाहनांवर कारवाई किंवा पर्याय काय, टाफिक वाहतुक शाखेचे पोलिस निरीक्षक, आहेतच , आजुन वाहतुकीची कोंडी, व्यवस्था साठी , सहाय्यक पोलिस आयुक्त हि आहेतच, प्रत्येक पॉईटवर वाहतुक शाखेचे पोलिस तैनात करण्यात आले आहेत हेही तितकेच खरे आहे,' पण कारवाई करणार कोण? हा ही मोठा प्रश्न आहे,' कोणाच्या आदेशाची वाट बघायची आहे, कोणाचा दबाव तंत्र वापरून सर्व काही सुरु आहे,' कोणत्या आकाची छत्रपती संभाजीनगर चलती आहे, हे पण उजेडात येणे गरजेचे आहे, कारण कायदा सर्वांसाठी आहे हेही तितकेच खरे आहे नुसती म्हणच ठरायला नको?

# नाशिक शहरामध्ये वास्तव्य करणाऱ्या आठ बांगलादेशी घुसखोरांना अटक!

## छत्रपती संभाजीनगरातही कोंबिंग ऑपरेशन कधी?

नाशिक : नाशिक पोलिसांच्या मध्यवर्ती गुन्हे शाखेने अवैधरित्या घुसखोरी करून शहरामध्ये वास्तव्य करणाऱ्या आठ बांगलादशी नागरिकांना अटक केली. हे सर्व बांगलादेशी नागरिक शहरातील विविध भागातील बांधकामाच्या साइटवर आपली ओळख लपवून राहत होते.


पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी पत्रकार परिषदेत या घटनेची सविस्तर माहिती ६ फेब्रुवारी रोजी दिली. मध्यवर्ती गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण माळी यांना मिळालेल्या गोपनीय माहिती नंतर मध्यवर्ती गुन्हे शाखेच्या पथकाने या संशयित घुसखोर नागरिकांवर हुशारीने पाळत ठेवली होती. या कामगिरी दरम्यान गुन्हे शाखेच्या कर्मचाऱ्यांनी साईट सुपरवायझर, बांधकाम मजूर यांचे वेशांतर केले होते.

पथकाने आडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका बांधकाम साइटवर जाऊन सदर बांगलादेशी घुसखोरांच्या वास्तव्याची खातरजमा केली. सदर व्यक्ती बांग्लादेशी घुसखोर असल्याचे निष्पन्न होतात तांत्रिक विश्लेषण करून आठ संशयित लोकांना ताब्यात घेण्यात आले.

सुमन कलाम गाझी (वय २७), अब्दुल्ला अलीम मंडल (३०), शाहीन माफिजुल मंडल (२३), लासेल नूर आली शंतर (२३), असाद अर्शद अली मुल्ला (३०), अलीम सुआन खान (३२), अल अमीन आमि नूर शेख (२२) व मोसिन मोफिजुल मुल्ला (२२) अशी या बांगलादेशी घुसखोरांची नावे आहेत. त्यांच्याजवळ भारतीय नागरिकत्वाचा पुरावा मागितला असता तो ते सादर करू शकले नाहीत. तसेच दोन जणांकडे आधार कार्ड मिळाले आहे. ताब्यात घेतलेल्या व्यक्तींची अधिक चौकशी केली असता बांगलादेशातील एका व्यक्तीने त्यांना सीमापार करण्यास मदत केल्याचे सांगण्यात आले. यातील आरोपी सुमन गाझी हा सर्वप्रथम भारतात आला व त्यानंतर त्याने त्याच्या संपर्कातून उर्वरित आरोपींना भारतात आणि पुढे नाशिक मध्ये आणले.

# अखेर रोहित शर्मा चमकला, केले ४९ वे आंतरराष्ट्रीय शतक

**बाराबती** स्टेडियममध्ये झालेला इंग्लंड विरुद्धचा एकदिवसीय सामना भारताने चार गडी राखून जिंकला. या विजयासह भारताने इंग्लंड विरुद्धची तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका २ - ० अशी जिंकली. कटकच्या सामन्यात कर्णधार रोहित शर्माची बॅट तळपली. त्याने ९० चेंडूत सात षटकार आणि बारा चौकार मारत ११९ धावांची खेळी केली. रोहितच्या शतकामुळे भारताचा विजयाचा मार्ग सुकर झाला. या सामन्याचा साम नावीर हा पुरस्कार रोहित शर्माला देण्यात आला. मागील अनेक दिवसांपासून क्रिकेटप्रेमी वाईट कामगिरीसाठी रोहित शर्मावर टीका करत होते. अखेर रोहितने टीकाकारांना बॅटद्वारे प्रत्युत्तर दिले. रोहित शर्माने कसोटी क्रिकेटमध्ये १२, एकदिवसीय क्रिकेटमध्ये ३२ आणि टी २० मध्ये ५ अशी ४९ आंतरराष्ट्रीय शतके झळकावण्याची कामगिरी केली. त्याने कसोटी क्रिकेटमध्ये ४३०२, एकदिवसीय क्रिकेटमध्ये १०९८७ आणि टी २० मध्ये ४२३१ अशा एकूण १९ हजार ५२० धावा आंतरराष्ट्रीय क्रिकेटम ध्ये केल्या आहेत. कटकच्या सामन्यात नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेणाऱ्या इंग्लंडने ४९.५ षटकांत सर्वबाद ३०४ धावा केल्या. धावांचा पाठलाग करणाऱ्या भारताने ४४.३ षटकांत ६ बाद ३०८ धावा करुन सामना जिंकला. भारताने इंग्लंड विरुद्धचा नागपूरमधील एकदिवसीय सामना चार गडी राखून आणि कटकमधील सामनाही चार गडी राखून जिंकला. लागोपाठ दोन विजय मिळवणारा भारतीय संघ आता अहम दाबादच्या नरेंद्र मोदी क्रिकेट स्टेडियममध्ये बुधवार १२ फेब्रुवारी रोजी विजयाची हॅटट्रिक करण्यास उत्सुक असेल तर इंग्लंड व्हाईट वॉश टाळण्यासाठी प्रयत्न करताना दिसेल.



# इंडिया आघाडी धडा घेणार?

भाजपच्या अश्वमेधाने आपल्या विजयाची परंपरा कायम ठेवत आता दिल्ली काबीज केली आहे. मात्र, दिल्ली विधानसभेचा निकाल विरोधी पक्षांना सतर्क करणारा आहे. इंडिया आघाडी यातून धडा घेणार काय? हा खरा प्रश्न आहे. शेवटी, भारतीय जनता पक्षाने २७ वर्षांनंतर दिल्लीच्या विधानसभेवर भगवा फडकविला आहे. भाजपने या निवडणुकीत 'झाडू' फिरवित आम आदमी पक्षाला साफ केले. २०२० च्या तुलनेत भाजपने यावेळी सहा पट जास्त विजय मिळविला आहे. २०२० मध्ये भाजपला केवळ आठ जागा मिळाल्या होत्या आणि आता ४८ जागा मिळाल्या आहेत. या निकालापासून इंडिया आघाडीने धडा घेण्याची गरज आहे. आम आदमी पक्षाचा पराभव झाला असला तरी भाजप आणि आपच्या मतांच्या टक्केवारीमध्ये फारसा फरक नाही ही बाब लक्षात घेण्यासारखी आहे. भाजपला आपपेक्षा केवळ तीन टक्के मते जास्त मिळाली आहेत.

आप आणि काँग्रेसने दिल्लीची निवडणूक एकत्र लढविली असती तर आपच्या किमान १५-२० जागा वाढल्या असत्या. या जागांवर आपचा पराभव झाला कारण काँग्रेसच्या उमेदवारांनी आपची मते आपल्याकडे ओढण्यात यश मिळविले. यामुळे इंडिया आघाडीने या निकालापासून धडा घ्यायला हवा. आम आदमी पक्षाच्या पराभवात काँग्रेसने खूप मोठी भूमिका बजावली आहे. दिल्लीत भाजपचे सरकार आल्यामुळे काँग्रेसच्या पोटात नक्कीच दुखत असेल. मात्र, जुना हिशेब चुकविल्याचा आनंद सुध्दा काँग्रेसच्या मनात निर्माण झाला असेल. नवी दिल्ली मतदारसंघातून काँग्रेसने उमेदवार उभा केला नसता किंवा संदीप दीक्षित यांच्याऐवजी अन्य कुणाला उमेदवारी दिली असती तर अरविंद केजरीवाल यांचा नक्कीच पराभव झाला नसता.

आता केजरीवाल पराभूत झाल्यामुळे काँग्रेस नक्कीच आनंदात असेल. शिवाय, आई शीला दीक्षित यांना पराभूत करणारे अरविंद केजरीवाल यांचा पराभव करून आपण हिशेब चुकता केला अशी भावना संदीप दीक्षित यांच्या मनात नक्कीच निर्माण झाली असेल. २०१० च्या दशकाच्या आयआयटीतून शिक्षण घेतलेले आणि पुढे आयआरएस सेवेत रूजू झालेले अरविंद केजरीवाल यांनी समाजसेवक अण्णा हजारे यांना पुढे आणून 'इंडिया अगेन्स्ट करप्शन' नावाची एनजीओ स्थापन केली होती. याच एनजीओच्या व्यासपीठावरून तत्कालीन काँग्रेसच्या डबल इंजिन सरकार म्हणजेच मनमोहन सिंग सरकार आणि शीला दीक्षित सरकारविरुद्ध भ्रष्टाचारविरोधी मोहीम छेडली. देशात वेगळे वातावरण तयार झाले. आणि २०१३ मध्ये झालेल्या निवडणुकीत आपने दिल्लीतील १५ वर्षांचे शीला दीक्षित यांचे सरकार उलथवून लावले. अण्णा हजारे यांच्या भ्रष्टाचारविरोधी चळवळीला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपचा गुप्त पाठिंबा होता असे बोलले जाते. 'इंडिया अगेन्स्ट करप्शन'च्या बॅनरखाली सुरू झालेली चळवळ यशस्वी झाल्यानंतर चळवळीतील लोकांनी एकत्र येऊन आम आदमी पक्ष (आप) ची स्थापना केली आणि दिल्ली विधानसभेची निवडणूक लढली. आरएसएस आणि भाजपने यापासून स्वतःला दूर केले. मात्र, तोपर्यंत अरविंद केजरीवाल यांनी त्यांची सामाजिक आभा निर्माण केली होती. हा काळ एवढा भारावला होता की पहिल्याच निवडणुकीत २८ आमदार निवडून आलेत. यावरून असे दिसून येते की, आपने तेव्हा केवळ काँग्रेसच नव्हे तर भाजपच्या मतदारसंघातही आपला प्रभाव निर्माण केला होता. २०१३ मध्ये धर्मनिरपेक्षतेच्या नावाखाली 'आप'ने काँग्रेसच्याच पाठिंब्याने भाजपविरोधी आघाडी सरकार स्थापन केले होते. २०१५ मध्ये मध्यावधी निवडणूक झाली आणि आपने ६७ जागा जिंकत दिल्लीत नवीन इतिहास रचला. काँग्रेसचा पराभव झाला आणि मुस्लीम मतदारांनी सुध्दा आपला मतदान केले. यामुळे आपचा ऐतिहासिक विजय झाला. काँग्रेसच्या काळातील भ्रष्टाचारांना जनता कंटाळली होती. यामुळे दलित, मागासवर्गीय आणि उच्च जातींव्यतिरिक्त, पूर्वांचल, उत्तराखंड तसेच दिल्लीतील पंजाबी-बनिया समाजाने सुध्दा आपला मतदान केले.

याचा भाजपला जबरदस्त धक्का बसला. कारण भाजपने २०१४ ची निवडणूक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली जिंकली होती.

# वैश्विक शांतीचा - अहिंसेचा संदेश देणारे - संत सेवालाल महाराज

**(संत सेवालाल महाराज यांचा जन्म राम नवमी या दिवशी झालेला आहे. त्यानिमित्ताने पोहरादेवी येथे दरवर्षी रामनवमीला व्यापक प्रमाणात हर्षोउल्लासात जन्मोत्सव साजरा केला जातो. या जन्मोत्सवास देशभरातील लाखो श्रद्धाळू येतात. संत सेवालाल महाराज यांच्या जयंती दिनी पोहरादेवीच्या पवित्र भूमित पशु हत्या करणे अनुचित आहे. संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त हा विशेष लेख)**

भारत हा साधु संत, ऋषि मुनींचा देश आहे. या देशात अनेक संत महात्म्य होऊन गेलेले आहेत. त्यापैकीच अठराव्या शतकातील संत सेवालाल महाराज एक होत. त्यांचा जन्म परंपरेने व्यापारी आणि गोपालक, गोरक्षक असलेल्या गोर बंजारा परिवारात रामनवमीच्या दिवशी १७३९ साली आंध्र प्रदेशातील गोलालडोडी, ता. गुत्ती, जिल्हा अनंतपूर येथे झाला. त्यांचे बालपणीचे नाव सेवादास होते. ते सेवाभाया, तोडावाळो, मोतीवाळो अशा विभिन्न नावाने ओळखले जायचे. संत सेवालाल महाराज यांनी केवळ मानवजातीचाच नव्हे, तर सर्व प्राणीमात्रांचे हित साधणारे कार्य त्यांनी केले. ते जगतजननी, विश्व व्यापिणी, चैतन्यमयी आई जगदंबेचे निस्सीम उपासक होते. त्यांनी समाजाला संकुचित, हलक्या विचारांपासून वर उठून श्रेष्ठ जीवन जगण्याची शिकवण देऊन आयुष्यभर गोरगरीबांची आणि गोसेवा मनोभावे केली. त्यांच्याकडे साडे तीन हजार पेक्षा अधिक गोधन होते. त्यांनी भक्ती आणि कर्म याची सांगड घालून समाजाला कर्मचे मोल त्यांनी आपल्या आचारणातून पटवून दिले. दुष्ट प्रवृतीच्या लोकांबद्दल ते एका लडीत म्हणतात -



**कपट वाचा लेन आये, पाप सोबत रिये ।**
**यम घरेरो फांसो ओरे गळेमा पड जाये ।**
**नव मणेरी काया ओरी नर्केमा मल जाये ।**
**लख चौयासी योनी भोगाये सेवाभाया ।**

भावार्थ - ज्याच्या मनात कपट आहे, पाप आहे, दुष्ट भावना आहे, अशांच्या डोक्यावर सदैव पाप कर्माचे ओझे असते. अशा दृष्ट प्रवृतीच्या लोकांच्या गळ्यात यम राजाचा फासीचा फंदा फार लवकर पडत असतो. असा दुष्ट माणूस नरकात जातो. तो जन्म मृत्युच्या फेंयात दुःख भोगत रहातो. त्यामुळे प्रत्येक माणसांनी नीति नियमाने, सदाचाराने वागले पाहिजे. त्यांनी समाजाला दिलेला उपदेश जीवनमूल्यांची पेरणी करण्यास आजही उपयोगी आहेत. सतमार्गाने जीवन व्यतीत करण्यासाठी, मनुष्य जीवनाचे सार्थक करण्यासाठी सद्गुणांचे महत्व सांगतांना आणि जीवन हे केवळ कसे तरी अघळपघळ जगण्यासाठीच नाही, तर ते फार मौल्यवान आहे, या बाबत उपदेश देतांना पुढील लडीत ते म्हणतात की,

**सत्य, दया, धर्म ,**
**लीनता ये गणेती रेणोर ।**
**श्री भगवानेरे शरण जाणो,**
**भव सागर तर जाणोर ।**

भावार्थ - आपल्यात सत्य, दया, धर्म, लीनता हे दैवी गुण विकसित करुन दुःख, पीडा, अडचणीने भरलेले जीवन नावाचा जो भवसागर आहे, तो सहज तरुन जाण्यासाठी ईश्वराची शरण ग्रहण करुन जीवन व्यतीत करावे. आणि भव सागर सहज तरुन जावा. या लडीव्दारे त्यांनी अध्यात्माला विशेष महत्व दिलेले आहे. संत सेवालाल महाराजांनी व्यवहार आणि अध्यात्माची सुंदर सांगड घालून जीवन मूल्य वृद्धिगत करण्याचा आग्रह त्यांनी या लडीत धरलेला आहे. प्रपंच सांभाळत अध्यात्माची गोडी लाऊन घेतली पाहिजे. त्यांनी समाजाला कोणत्याही निरथर्क कर्मकांडात गुंतवले नाही. या समाजात बर्याच कुप्रथा होत्या. आणि आजही बर्याच आहेत. कालांतराने त्या निश्चितपणे कमी होतीलही. एक प्रथा अशी होती की, या समाजात जात पंचायत होती. ती अतिशय आदर्श अशी होती. पण यातील एक बाब संत सेवालाल महाराजांना नेहमी खटकायची ती म्हणजे, जात पंचायतीत ज्याच्यावर जो कांही आरोप ठेवण्यात आलेला आसायचा तो जर का सिद्ध झाला तर त्या व्यक्तिस दंडित केले जायचे. गरीब आसो की श्रीमंत. आर्थिक दंड आकारला जायचाच. ऐपत असो वा नसो. पंचायतीने ठोठावलेला दंड द्यावाच लगायचा. आपल्या समाजातील, या नीति आणि या परंपरेवर आसूड ओढतांना पुढील लडीत ते अतिशय कठोर शब्दात म्हणतात की,

**गोर गरीबेन दांडन खाये ।**
**सात पीढि नर्केमा जाये ।**
**ओरे वंशेपर कोई कोनी रीये राम ।**
**पायरीरो भाटा वियेरे, बंगला कोट मॅयामा ।**

भावार्थ- गरीबांना दंड लाऊन पोट भरर्णायांनो ! तुमच्या सात पिढ्या नरकात जातील, तुमच्या वंशाचा दिवा लावायला कोणी राहणारा नाही. तुमचा वंश नष्ट होईल. तुम्ही पायरीचा दगड बनून कित्येक वर्ष तुडवले जाल. अशा कठोर शब्दात त्यांनी आपल्या समाजातील रुढीबद्दल बोलायचे. तेंव्हा असे प्रकार तुम्ही बंद करा. हा निर्वाणीचा इशारा ते आपल्या समाजाला देत असत. त्याकाळी हा उपदेश महाराजांनी आपल्या समाजाला जरी दिला असला. आणि ते फक्त एका परंपरेबाबत जरी दिलेला असला तरीही तो वर्तमान काळात आज गोर गरीब समाज मग कोणत्याही जाती धर्माचा असो. गरीबांची पिळवणूक करुन जे लोक जगतात. त्यांना प्रताडित करुन, त्याची पिळवणूक करुन पोट भरर्णायांची संख्या दिवसेंदिवस वाढत चाललेली आहे. अशांसाठीसुद्धा ही लडी लागू पडते. संत महापुरुष कोणत्याही जाती धर्मात जन्म घेवोत. त्यांचा प्रत्येक स्वास हा समस्त सृष्टिसाठीच असतो. समस्त जीवांसाठीच असतो, समस्त मानव जातीसाठी असतो. संत सेवालाल महाराज ज्या समाजात जन्माला आले होते त्या समाजात त्याकाळी फारसे शिक्षण नव्हते. जवळपास शिक्षण नसल्या सारखेच होते. अशा काळी संत सेवालाल महाराजांचे अमृतवचन नोंदवणे जमलेले नव्हते. त्यांचे वचन पीढि दर पीढि तोंडी संग्रहीत होत गेले. संत सेवालाल महाराजांच्या अनेक जीवन लीला आजही गोर बंजारा समाजात चर्चिल्या जातात. संत म्हणजे एक प्रकारे जीवन प्रवासाला लागणारा ज्ञानरुपी प्रकाश. जीवनात येणारे अनेक संकटं, दुःख, पीडाप्रसंगी साहस, बळ, शक्ती देऊन हिंमतीने पुढे चालण्यासाठी मार्गदर्शन करणारे, अज्ञान अंधारातून ज्ञान प्रकाशाकडे घेऊन जाणारे निःस्वार्थ, निर्मोही, निर्लोभी व्यक्तित्व म्हणजे संत. ज्यांच्या अंगी सहजता, साधेपणा, परोपकार, अहिंसा, दया, क्षमा, शांती, प्रेम, सहिष्णुता हे दैवी गुण ओतप्रोत भरलेले असते. संताच्या या गुणातील एक तरी गुण आपल्या जीवनात उतरला पाहिजे. जसा सूर्य भेदभावरहित सर्वांना समान प्रकाश देतो तद्वतच विश्वभरातील संत मानव जातीला निरंतर ज्ञान प्रकाश देत असतात. संत सेवालाल महाराजांचे अनमोल विचार आणि शिकवण प्रत्येक समाजासाठी आजही उपयोगी आहे. जीवन उद्धारक आहे. कोणत्याही संतांना जाती धर्माच्या तराजुत तोलणे गैर आहे. जगभरातील संतांचा इतिहास उघडून पाहिला तर असे दिसून येईल की, संत महापुरुष जरी एखाद्या जातीत किंवा धर्मात जन्माला आलेले असले तरीही त्यांचे कार्य हे फक्त एका जातीसाठी किंवा धर्मासाठी कधीच मर्यादित नव्हते. ते संपूर्ण मानव जाती बरोबरच प्राणीमात्रांसाठीच राहिलेले आहे. संत सेवालाल महाराज तरी त्याला अपवाद कसे राहतील ! त्यांचे कार्यसुद्धा अखिल मानवासाठी होते. संत सेवालाल महाराजांच्या काळात गोर बंजारा समाजात आरदासच्या माध्यमातून (प्रार्थना) विश्वकल्याणाची भावना अधिक वाढीस लागली. 'सेनं सायी वेस ' (सर्वांना प्रसन्न हो , सर्वांचे मंगल होवो, सर्वांचे कल्याण होवो) . ही परस्पर बंधुभाव वाढवणारी भावना जनसामान्यात सर्व दूरपर्यंत जायला हवी. या आरदासमध्ये (प्रार्थनेमध्ये) एका ठिकाणी असे म्हटले आहे की, ' किडी मुंगीन सायी वेस, वाडी वस्तीन सायी वेस.' हे भगवती, हे जगत जननी , या विश्वातील मुंगीहुन लहानातील लहान जीवाचे तू भले कर, त्यांचे मंगल कर. प्राणीमात्रावर दया कर, तू सदैव सर्वांवर प्रसन्न रहा. वैश्विक शांतीचा, अहिंसेचा संदेश देणारे संत सेवालाल महाराज आजही वंदनीय आहेत. लडीव्दारे लोकांना उपदेश देतांना ते म्हणायचे की, नीति नियमाने वागा, कोणाचेही वाईट चिंतु नका, चोरी करु नका, कोणालाही दंडित करु नका, दुर्सयांची धन संपती बळकावू नका. धनसंपत्तीच्या बळावर गोर गरीबांना छळू नका, त्यांना त्रास देऊ नका, जीवहत्या करु नका, पाप कर्मापासून नेहमी दूर रहा, सर्वांच्या हिताचे रक्षण करा. अहिंसेच्या मार्गाने चला.

संत सेवालाल यांनी उद्गारलेली अनेक वचनं आज प्रत्यक्ष अनुभवाला येत आहेत. जसे - 'रपिया कटोरो पाणी वकीये' म्हणजे एक रूपयाला एक वाटी पाणी विकल्या जाईल. 'बेटा मां बापेन भारी विये' भावार्थ - ' ज्या आई वडिलांनी मुलांना जन्म देऊन त्यांचे लालनपालन करुन मोठे केले . ती मुलं आई वडिलांचे म्हणणे ऐकणार नाहीत, मनमानी करतील.' आज या सर्व गोष्टी प्रत्येक समाज अनुभवतो आहे.

जर आपण हृदयापासून संतांच्या आश्रयाला असू किंवा संतांची भक्ती केली तर त्यांचे सर्व हितकारक गुण आपल्यात उतरले पाहिजेत. संताच्या दैवी वाणीनुसार वागले पाहिजे, त्यांनी सांगितलेल्या कल्याणाच्या मार्गावर चालले पाहिजे आणि मानव जीवनाचे सार्थक केले पाहिजे. कोणतेही संत उपासकास सत्याशी जोडतात. जे उपासक किंवा श्रद्धाळू संतांची सेवा ,भक्ती मनापासून करतात ते संतानी ज्या तत्वाची, शक्तिची उपासना, आराधना केलेली असते त्या तत्वाशी किंवा शक्तिशी जोडल्या जातात . हे मर्म समजून जो कोणी संतांच्या मार्गाने चालतो त्याला याची अनुभूति निश्चितपणे येते म्हणजे येतेच. संत महापुरुषांची जयंती साजरी करणे निश्चितच ऊर्जा देणारा प्रसंग असतो, पण संत महापुरुषांचे एक दिवस केवळ गुणगान करुन, ढोलतासे बडवून जयंती साजरी केल्याने स्वतःचा किंवा समाजाचा उद्धार कधीही होणार नाही. उद्धाराचा मार्ग एकच आहे आणि तो म्हणजे संतांच्या कल्याणकारी विचार मार्गाने वाटचाल करणे.

मानवता, अहिंसेचे पुजारी संत सेवालाल महाराज यांच्या मानव कल्याणकारी विचारांना बळ देण्यासाठी प्रत्येकानी स्वतः पासून सुरुवात करायला पाहिजे. स्वतःला, स्वतःच्या परिवाराला, समाजाला अधोगतिकडे घेऊन जार्णाया सर्व वाईट चालीरीती, कुप्रथा, अंधश्रद्धा, रुढी परंपरा, देवी देवतांच्या नावाने केली जाणारी पशुहत्या, व्यसन, हुंडा पद्धत या गोष्टीचा त्याग करायला पाहिजे. ही खरी संत सेवा आहे. ही खरी संत भक्ती आहे. केवळ एक दिवस हुल्लडबाजी करणे म्हणजे क्षणिक आनंद आहे. खरा आनंद घेण्यासाठी संत विचार आपल्या जीवनात रुजवून मर्यादित, संयमपूर्ण जीवन जगावे लागेल. आज अनेक लोक देवाला, संत महापुरुषाला मानतात. घरात मोठमोठे फोटो ठेवतात. पण आचरण मात्र विसंगत करतात. संत सेवालाल महाराज यांची वाणी, त्यांचा उपदेश हा केवळ भाषणाचा विषय नसून ते उन्नत, श्रेष्ठ जीवन जगण्याचे एक अमूल्य साधन आहे. हे जो पर्यंत समाज समजून घेणार नाही तो पर्यंत भक्ती कमी आणि देखावा जास्त हे प्रकार मोठ्या प्रमाणावर दिसत राहणार आहेत. मानवतावादी, अहिंसावादी संत सेवालाल महाराजांच्या विचारांना उजाळा देण्यासाठी त्यांच्या वचनानुसार आचरण केले पाहिजे. संत सेवालाल महाराज यांचे विश्व कल्याणाच्या विचारांचा सार असा आहे की, जसे उपनिषेधात म्हटलेले आहे-

**ॐ सर्वे भवन्तु सुखिनः।**
**सर्वे सन्तु निरामयाः।**
**सर्वे भद्राणि पश्यन्तु।**
**मा कश्चितब दुःख भाग्भवेत?**
**ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः?**

हे ईश्वरा ! सर्वांना सुखी ठेव, सर्वांना रोगमुक्त ठेव, सर्वांचे जीवन मंगलमय बनव आणि कोणीही दुःखाचे भागीदार बनु नये. असा आम्हाला वरदान दे. हाच भावार्थ संत सेवालाल महाराजांच्या समग्र शिकवणुकीचा आहे. प्रत्येकांनी हा धागा पकडून जरी जीवन व्यतीत केले तरीही मानव जीवन सार्थक होऊ शकते. जगातील वर्तमान हिंसक चित्र पाहता संत कोणत्याही जाती धर्माचे असोत त्यांचे जीवनोपयोगी, मानवता धर्म समाजात रुजवणारे विचार ग्रहण करुन आपल्या जीवनाचे सार्थक करणे यातच स्वतःचे आणि विश्वावाचे कल्याण आहे. आजच्या काळात संत मार्गाने गेल्याशिवाय जगात शांतता नांदणार नाही.

– **प्रा. फुलसिंग जाधव,** छत्रपती संभाजीनगर

# गोळेगांवातुन पाणलोट वॉटरशेड यात्रेचा शुभारंभ

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

खुलताबाद तालुक्यातील गोळेगांव इथून केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्या समन्वयातुन राबविण्यात येणारया पाणलोट (वॉटर शेड) योजनांची माहिती एका रथाद्वारे गांवागांवा पोहचविण्यात येणार असुन, याची सुरुवात खुलताबाद तालुक्यातील गोळेगांव येथुन शनिवारी (ता. आठ) करण्यात आला, यावेळी अध्यक्षस्थानी राज्याचे मृद व जलसंधारण आयुक्त प्रकाश खपले हे होते.

यावेळी मार्गदर्शन करतांना आयुक्त खपले यांनी मार्गदर्शन करतांना सदरील भाग दोन योजनेत केंद्र सरकारचा ६० तर राज्य सरकारचा वाटा ४० टक्के आहे.पाणी हेच जीवन असुन,शेतातील पिके असो वा पिण्यासाठी पाण्याची गरज असो, त्याच बरोबर जलसेत्रोत घटत आहे,भारतात एक हजार फुटापर्यंत विंधन विहीर घेतल्या जात आहेत,या आधी १९७२ चा भीषण दुष्काळ बघितला आहे,पाण्याची निकड पाहता पाण्याचे स्थानिक. स्त्रोत निर्माण करण्यावर भर द्यावा लागणार आहे, माथा ते पायथा पाणी अडविण्यासाठी काम जास्त गतीने



करण्याची गरज असुन, पाणी तयार करु शकत नाही, असलेलं मात्र काटकसरीने वापरणे हाच उपाय आहे.

यावेळी रथ यात्रेच उद्घाटन झाले असुन, पुढील ६० दिवस ती गांव पातळीपर्यंत पोहचणार आहे, यावेळी राज्याचे मृद व जलसंधारण आयुक्त खपले, यांच्यासह अप्पर आयुक्त नितीन दुसाने, प्रादेशिक जलसंधारण अधिकारी अजित परांडे, जिल्हा कृषी अधीक्षक प्रकाश देशमुख, जिल्हा जलसंधारण अधिकारी नरेंद्र कटके, जालना येथील जिल्हा जलसंधारण अधिकारी सुंदर वाघमारे, तहसीलदार स्वरूप कंकाळ, पाणी फाउंडेशनचे प्रल्हाद अडसूळ, भारतीय जैन संघटनेचे प्रवीण पारख, सरपंच संतोष जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयी केलेल्या वक्तव्याप्रकरणी अभिनेता राहुल सोलापूरकर यांच्याकडून स्पष्टीकरण

छत्रपती शिवाजी महाराजांविषयी वादग्रस्त वक्तव्य असलेला अभिनेता राहुल सोलापूरकरांचा एक व्हिडिओ क्लिप व्हायरल झाल्यानंतर आता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयी वादग्रस्त वक्तव्य असलेला व्हिडिओ क्लिप व्हायरल झाली आहे. त्यांच्या या व्हायरल व्हिडिवर अनेकांनी संतप्त प्रतिक्रिया दिल्या असून राहुल सोलापूरकरांनी त्यांची भूमिका स्पष्ट करून माफी मागितली आहे. सोशल मीडियावर त्यांनी यासंदर्भातील व्हिडिओ पोस्ट केला आहे.

राहुल सोलापूरकर म्हणाले, ङ्गमी अभिनेता आणि व्याख्याता राहुल सोलापूरकर. मी पुन्हा वेगळ्या कारणाकरता तुमच्याशी संपर्क साधतोय. दोन स्पष्टकीरणं देणं मला महत्त्वाचं वाटलं. माझ्या एका २३ नोव्हेंबरच्या पॉडकास्टमधील दोन ओळी व्हायरल करून मध्यंतरी गदारोळ करण्यात आला. हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आग्र्याहून सुटताना प्रसंगाविषयी बोलताना माझ्याकडून एक चुकीचा शब्द बोलण्याच्या ओघात गेला होता, त्यामुळे अनेकांच्या भावनांना ठेच लागली. याबद्दल मी जाहीर माफीही मागितली.

# भालगाव ग्रामपंचायतमध्ये माता रमाई जयंती साजरी !



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

भालगाव ग्रामपंचायतमध्ये माता रमाई आबेडकर यांची जयंती निमिताने सरपंच अश्विनी डिघुळे उपसरपंच भाउ साहेब पाटिल, देवकर शिवसेना तालुका उपप्रमुख पांडुरंग डिघुळे, सोसायटी सदस्य भाउ साहेब शेजुळ, ग्रामपंचायत सदस्या सरूबाई देवकर, भगवान देवकर, दिपक देवकर, उध्व डिघुळे, संग्राम सिंग राजपुत, शिपाई नकुल बनकर आदीची प्रमुख उपस्थिती होती.

# शेद्रा भालगाव रोडची दुरवस्था कायम ? सहा महिन्यात दोनंदा डांगडुजी! त्याच ठेकेदाराला पुन्हा तेच काम? सामान्य नागरीकाचा प्रश्न!

**चित्ते पिपंळगाव –** भालगाव ते शेद्रा या ७ कि मी रस्त्या पैकी दोन कि मी रस्ता रेल्वे उडान पुल ते जि प्र प्रा शाळे प्रर्यत चार कि.मी. प्रयत्न. रस्ता ठिक आहे पुढे शाळा ते बोरनवी या दोन कि मी रस्त्याची संपुर्ण वाट लागली आहे. त्यात चहा महिने पुर्वी याच ठेकेदाराने हे खडे बुजवण्याचे काम ताबडतो उरकुन घेतल आज रोजी पुन्हा त्यानाच पुन्हा या रस्त्याचे काम कसे मिळते हा मोठा विचार करणे लायक मोठा गंभीर प्रश्र्ण सर्व सामान्य नागरीकब यांना पडला आहे तेव्हा अशा ठेकदाराला अताचे बील अदा करू नये अशी मागणी शिवसेना तालुका उपप्रमुख पांडुरंग डिघुळे यांनी सार्वजनिक बाधकाम .विभाग छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे केली आहे.

# ॲग्रोव्हिजन गटशेती संघांचे करजगावात रंगले चर्चासत्र



**जालना**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

जालना जिल्ह्यातील ॲग्रोव्हिजन गटशेती संघाच्या वतीने प्रत्येक महिन्याच्या ९ तारखेला आयोजिण्यात येणारे फेब्रुवारी महिन्यातील नियमित मासिक चर्चासत्र रविवार (दि. ९ फेब्रु.) रोजी भोकरदन तालुक्यातील मौजे करजगांव (कल्याणी ) येथे अत्यंत उत्साहात पार पडले.

गटशेतीच्या माध्यमातून पीकविलेल्या दर्जेदार मालाचा ब्रँड करून आपल्याला आपल्या मालाची किंमत ठरवून पाहिजे तो भाव पदरात पाडून घेता येतो असे ॲग्रोव्हिजन गटशेती संघाचे संस्थापक प्रमुख श्री. संजय मोरे पाटील यांनी यावेळी आपल्या अनुभवातून सोदाहरण सांगितले.

रामेश्वर सहकारी साखर कारखान्याचे संचालक श्री. मोतीराम नरवाडे, 'आप' चे श्री. कडुबा बोरसे, वखारीचे श्री. रामप्रसाद खैरे, कुसळीचे श्री. विठ्ठल वैद्य, फुलंब्री तालुक्यातील बाभुळगावचे श्री. रावसाहेब मोरे, वालसाचे डॉ. गणेश पोटे, पळसखेड पिंपळेचे श्री. गणेश पिंपळे, श्री. भरत पिंपळे, श्री. गुलाब पिंपळे, श्री. राजू पिंपळे, बोरगाव जहागीरचे श्री. विष्णू दळवी, जळगाव सपकाळचे श्री. संजय सपकाळ, श्री. दिलीप सपकाळ, पिंपळगाव रेणुकाईचे श्री. घनशाम देशमुख, श्री. समाधान चिलार, श्री. सुभाष नरवाडे, श्री. संदीप गावंडे, हिसोडा खुर्दचे श्री. संतोष साळवे, कल्याणीचे श्री. विजयसिंग खंडाळकर, पळसखेडा मुर्तडचे श्री. किसन सोनुने, शेख हिराजी शेख सुपडू, करजगांवचे श्री. सुनिल लोखंडे, श्री. अमोल बोरसे, श्री. शेख साबेर, श्री. रविंद्र बोरसे, श्री. गणेश गावंडे यांनी शेती संदर्भातील आपले अनुभव कथन केले. शेतीमध्ये मेहनतीपेक्षा ज्ञानाला जास्त महत्व असून शेतकऱ्यांना आता स्मार्ट शेतीकडे वळावे लागेल.

विचाराची देवाण घेवाण करण्यासाठी शेतकऱ्यांनी तज्ज्ञ शेतकरी, शास्त्रज्ञब यांच्या संपर्कात राहून शेतीविकास घडवण्याची गरज यावेळी या सर्वांच्या बोलण्यातून व्यक्त करण्यात आली.

सुरुवातीला आयोजक श्री. संतोष बोरसे यांच्या संयुक्त अशा शून्य मशागत शेतीवर शिवारफेरी करण्यात आली. श्री. संतोष बोरसे यांनी उपस्थितांचे आभार मानले. वन भोजनाने चर्चासत्राची सांगता झाली.

# स्वामी विवेकानंद विद्यालयाच्या १० वी व १२वीच्या विद्यार्थ्यांना निरोप!

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

येथील स्वामी विवेकानंद विदयालयाच्या १०वी व १२वीच्या विदयार्थाना निरोप दे ण्यात आला यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी मुख्याध्यापक श्री रावसाहेब गाडेकर तर प्रमुख पाहूणे म्हणून शालेय समितीचे अध्यक्ष संतोष गावंडे सरपंच वंदना सोनवणे माजी सरपंच शाहादेव बागडे माजी उपसरपंच राहुल म्हस्के होते.

यावेळी वर्गशिक्षिका नुतन महाले शिक्षक सुरेक्ष पठाडे अशोक रोडे उमेश मुल्गीरे सोनाजी गायकवाड अमोल गांव डे अंकुश पवार कृष्णा मते गणेश शेजुळ सिध्दार्थ आर के जयश्री यादव संपना पठाडे सरोदे सर सुरडकर सर . यावेळी मु अ श्री गाडेकर यांनी १० वी व १२वीच्या विदयार्थी व विदयार्थीना पुढील वाटचाली सुभेच्छा दिल्या चांगला अभ्यास केला तर पुढचे. जीवन सुखकर होते यासाठी मेहनत करणे. आजच्या स्पर्धा युगात तोच टिकतो जो मेहनत करतो असा सल्ला दिला यावेळी १२वीच्या विदयार्थानी सलोनी शेजुळ कावेरी पठाडे गायत्री पठाडे गीता .वीर रोहणी गांवडे योगीती गांवडे साध्वी ताप किर निकिता गांवडे कावेरी कदम स्वाती डिघुळे निकिता औटे एशर्व या हिरेकर गायत्री भारती आदिनी आप आपले मनोगत व्यक्त केल या कार्यक्रमाचे प्रस्तावीक सरोदे सर यांनी केले

# बालविवाह रोखण्यास संवेदनशीलतेची गरज - प्रा. अनिल गवळे



**बिडकीन (प्रतिनिधी)**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ सलग्नित एकता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना सात दिवसीय निवासी श्रमदान शिबिर मौजे निलजगाव येथे सुरू आहे. आज शिबिराच्या पाचव्या दिवसाचे चौथे बौद्धिक सत्र संपन्न झाले. बौद्धिक सत्रात बालविवाह प्रतिबंध कायद्याचे समावेश प्रबोधन या विषयावर युवा विचारवंत प्रा. अनिल गवळे यांनी निलजगाव ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. शासनाने केलेल्या कायद्याची कडक अंमलबजावणी झाली पाहिजे यासाठी समाजातील जागृत नागरिकांनी पुढाकार घेणे काळाची गरज आहे. बालविवाह रोखण्यास संवेदनशीलतेची गरज आहे असे प्रा. गवळे म्हणाले.

याप्रसंगी मंचावर उपस्थित चौथ्या बौद्धिक सत्राचे अध्यक्ष परमेश्वर मोगल, सत्र समन्वयक डॉ. मुखत्यार शेख होते. या सत्राचे प्रास्ताविक प्रा. सय्यद मुजीब यांनी केले. यावेळी प्रमुख अतिथी अरुण मुगदल, कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. अर्चना काटकर उपस्थित होते. या सत्राचे सूत्रसंचालन बी.ए. तृतीय वर्षाची विद्यार्थिनी सादिया शेख तर आभार प्रदर्शन बी.ए. द्वितीय वर्षाचा विद्यार्थी कल्याण खळदकर यांनी केले

# भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या वतीने सिद्धार्थ उद्यान येथे त्यागमूर्ती माता रमाबाई यांची जयंती साजरी



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या वतीने सिद्धार्थ उद्यान येथे त्यागमूर्ती माता रमाबाई यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळेस महानगर पालिकेचे उद्यान प्रमुख विजय पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते भिम शक्ती संघटनेचे शहर जिल्हाध्यक्ष सतीश नरवडे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. संघटनेच्या वतीने वर्षभरात विविध सामाजिक कार्य करण्यात येत असतात. तसेच महापुरूषांना जयंती व स्मृतीदिनानिमित्त अभिवादनही करण्यात येते, असे सतिश नरवडे यांनी सांगितले.

यावेळेस संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष दिनकर ओंकार, महाराष्ट्र प्रदेश सचिव पंडित भाई नवगिरे, महाराष्ट्राचे सचिव शांतीलाल गायकवाड, प्रेम चव्हाण, संजय सातपुते, संजय जिने, पप्पू कांबळे, जिल्हाध्यक्ष विनोद कोरके, प्रेम चव्हाण, नितीन नवगिरे, स्वप्निल नरवडे आदींची उपस्थिती होती.

# गरजू लोकांसाठी भव्य मोफत आरोग्य शिबिर



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

जय साई नटराज नाट्य चित्रपट कला व सांस्कृतिक संस्था छत्रपती संभाजी नगर यांच्या माध्यमातून रुयाळ तालुका पवनी जिल्हा भंडारा येथे गरजू लोकांसाठी भव्य मोफत आरोग्य शिबिर घेण्यात आले त्यामध्ये अनेक गरजू लोकांची तपासणी उपचार व औषध मोफत कार्यक्रम घेतल्या गेला तसेच अन्नदान करण्यात आले.

या कार्यक्रमाला अध्यक्ष सौ विभा पाचोरे उद्घाटक गटविकास अधिकारी दीपक गरुड मुख्य अतिथी पः स सदस्य बादल ठवरे श्री उईके . ग्रामविकास अधिकारी . आय एल नंदागवळी सुर्यकिर नंदागवळी डॉ . होते संस्था अध्यक्ष विजय मानवतकर मुख्य व्यवस्थापक बंडू भिवगडे राजेन्द्र देवगडे किशोर मोरे .यांनी श्रमदान केले व या कार्यक्रमांमध्ये महिला उन्नती बेटी बचाव बेटी पढाव याविषयी माहिती दिली या कार्यक्रमासाठी शुभेच्छुक संपूर्ण जे एस एन एस गृफ सविता पोटे धम्मशिला कानेकर उषाताई चारभे शुभांगी जी विमल हातागळे छाया भुरेवाल नीतू लोणारे सूर्यकिरण नंदागवळी राजु आहिरे उपशहर प्रमुख शिवसेना . विनोद साबळे शिवसेना उपशहर प्रमुख शंकरराव वानखेडे ज्येष्ठ समाजसेवक हिंदू बहुजन महासंघ महाराष्ट्र राज्य अध्यक्ष भारती कांबळे हिंदू बहुजन महासंघ महिला आघाडी मनीष जी वर्मा फिल्म डायरेक्टर मुंबईआराधना सचानशक्ती लखनऊ मुंबई फिल्म अभिनेत्री .आरोग्य धुत एस आर तोगरे शैलेंद्र रैकवार मराठा सेवा संघ जिल्हाध्यक्ष रतलाम मध्य प्रदेश रावसाहेब लहाने क्रांतिकारी विचार मंच अध्यक्ष रामदास गायकवाड सुभद्राबाई शिक्षण प्रसारक मंडळ अध्यक्ष काशिनाथ जोहरे साहित्यिक बीजेपी विष्णू आहिले बीजेपी विलास पाटील रोशन मेश्राम सतीश जाधव उपाध्यक्ष महिला आर्थिक विकास महामंडळ ट्रेड युनियन महाराष्ट्र राज्य मुन्नीबाई मिश्रा उत्तर प्रदेश चित्रकूट मीनाक्षी पाखरे अध्यक्ष समृद्धी विकास सेवा ट्रस्ट मुंबई महादेव घाटे अमिताभ बच्चन ग्रुप कोल्हापूर .वंदना भंडारे श्री पारिक शिवाजी येडवान.

# AAGECA तर्फे गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप समारंभ संपन्न



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथील माजी विद्यार्थी संघटना (अअऋएउअ) तर्फे गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वितरण समारंभ दिनांक ६ फेब्रुवारी २०२५ रोजी माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या सभागृहात मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात एकूण ४४ विद्यार्थ्यांपैकी ३० गरजू विद्यार्थ्यांना प्रत्येकी २४,००० रुपये असे एकूण ७,२०,००० रुपयांचे धनादेश वितरित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री संजय डंभारे होते. प्रमुख अतिथी म्हणून नितीन सोमानी आणि महापारेषण परिमंडलाचे अधीक्षक अभियंता श्री रंगनाथ चव्हाण यांची उपस्थिती लाभली.

माजी विद्यार्थी संघटनेला महाविद्यालयातील विविध शाखांतील ४४ गरजू विद्यार्थ्यांकडून शिष्यवृत्ती अर्ज प्राप्त झाले होते. या अर्जांचे सखोल परीक्षण करून पात्रतेच्या निकषांनुसार ३० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. या उपक्रमासाठी माजी विद्यार्थी संघटनेतील ३६ सदस्यांनी मिळून ७.२० लाख रुपये निधी उभारला. विशेष बाब म्हणजे या निधीमध्ये केवळ भारतातीलच नव्हे तर परदेशातील माजी विद्यार्थ्यांचेही मोलाचे योगदान होते, ज्यातून त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे सुंदर उदाहरण साकारले गेले.

कार्यक्रमादरम्यान प्राध्यापक जामकर आणि प्राध्यापक वाय.एम. नाईक यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष डॉ. उत्तम काळवणे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. स्मिता कासार आणि उपकार्यकारी अभियंता सीमा गाडेकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन सचिव श्री किरण यंबाल यांनी मानले.

प्रमुख अतिथी नितीन सोमानी यांनी आपल्या महाविद्यालयीन आठवणींना उजाळा देत विद्यार्थ्यांना प्रेरक मार्गदर्शन केले. अधीक्षक अभियंता श्री रंगनाथ चव्हाण यांनी वीज निर्मितीपासून घराघरांपर्यंत वीज पोहोचण्याची प्रक्रिया, विजेची वाढती मागणी, उपकेंद्रांचे महत्त्व आणि महापारेषण कंपनीच्या कार्यप्रणालीबाबत सखोल माहिती दिली.

प्राचार्य श्री संजय डंभारे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना वाचनसंस्कृती जोपासणे, तसेच छझढएङ आणि सेल्फ-लर्निंग सारख्या उपयुक्त शैक्षणिक साधनांचा प्रभावी वापर करण्याचा सल्ला दिला.

कार्यक्रमाच्या शेवटी उरलेल्या १४ विद्यार्थ्यांना येत्या १ मार्च २०२५ रोजी शिष्यवृत्ती वितरित करण्याचे आश्वासन देण्यात आले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष डॉ. उत्तम काळवणे, उपाध्यक्ष श्री सुरेश तांदळे, सचिव श्री किरण यंबाल, श्री सुधीर बोंडेकर, श्री भास्कर चाटे, श्री शशिकांत येरनाळे, श्री प्रशांत नायकर, श्री दत्तात्रेय रेगुलवार, श्री देविदास गोरे, श्री दीपक गडेकर, डॉ. स्मिता कासार, उपकार्यकारी अभियंता सीमा गाडेकर यांच्यासह एक्झिक्युटिव्ह कमिटीच्या सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ.अंजना घुले यांनी विशेष मेहनत घेतली.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com.